अपर कामगार आयुक्त, गट-अ या पदावर पदोन्नती व पदस्थापना देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कामगार विभाग

शासन आदेश क्रमांक: पदोन्न-०५२६/प्र. क्र. १४१/कामगार-८

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक: ३१ ऑगस्ट, २०२६.

वाचा :

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-२०१८/ प्र.क्र. १५९/ कार्या-१२, दि.०१.०८.२०१९.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१.

३) कामगार आयुक्तालयाचे पत्र क्र. आस्था/अकाआ-पदो/प्र.क्र.१/प्रस्ताव/२०२६/कार्या-२/५९३, दि.२०.०५.२०२६.

शासन आदेश:

कामगार आयुक्त यांच्या आस्थापनेवरील कामगार उप आयुक्त, गट-अ (वेतनश्रेणी एस-२३: ६७७००-२०८७००) या संवर्गातील खालील नमूद अधिकाऱ्यास या आदेशाच्या दिनांकापासून अपर कामगार आयुक्त, गट-अ (वेतनश्रेणी एस-२५: ७८८००-२०९२००) संवर्गात या शासन आदेशान्वये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून, त्यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

अ.क्र	ज्ये. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	प्रवर्ग	पदोन्नतीनंतरची पदस्थापना / कार्यालय
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	०६	श्री. संभाजी बं. व्हनाळकर	खुला	अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग, मुंबई.

वरील अधिकाऱ्यास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे:

१) मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत उपरोक्त क्र. २ येथील दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर सहमती देण्यात येत आहे.

२) सदर अपर कामगार आयुक्त, गट-अ पदावरील पदोन्नती उक्त अधिकाऱ्यांना त्यांच्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील व पदोन्नतीसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

४) पदोन्नती कोट्यातील पदावर देण्यात येत असलेली सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपाची असून ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५) सदर निवडसूचीतील सेवाज्येष्ठतेनुसार पात्र असलेल्या तथापि, पदोन्नती नाकारलेल्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीसंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१२.०९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३. उपरोक्त तक्त्यात नमूद पदोन्नत अधिकारी श्री. व्हनाळकर यांना त्यांच्या पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कामगार आयुक्त यांनी तात्काळ कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांनी उपरोक्त पदावर रुजू होऊन, याबाबतचा रुजू अहवाल त्यांनी कामगार आयुक्त यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

४. तसेच, श्री. व्हनाळकर यांनी अनधिकृतपणे रजेवर जाऊ नये. तसेच, उपरोक्त पदस्थापना रद्द अथवा त्यात बदल करणेसाठी कोणत्याही स्वरुपाचे आवेदन सादर करु नये. तसे केल्यास श्री. व्हनाळकर हे शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील २ (ड) मधील तरतुदीनुसार पदोन्नतीने नियुक्ती होणाऱ्या अधिकाऱ्यांनी सदर आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या विहित मुदतीमध्ये रुजू होणे आवश्यक आहे. सदर मुदतीत रुजू न झाल्यास संबंधित अधिकाऱ्याचा अनुपस्थितीचा कालावधी अकार्यदिन (dias non) म्हणून गणला जाईल, याची देखील संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८३११३०४३९४९५४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=3389518A88AF500EF17FD52858804C56D5B0DB93CE68C963 8764849614F0C8B3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC 41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2026.08.31 13:05:21 +05'30'

(स्वप्निल कापडणीस)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
४. अपर कामगार आयुक्त, कोकण/पुणे/नागपूर.

५. कामगार उप आयुक्त (प्रशासन), कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
७. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
८. कामगार उप आयुक्त (प्रशासन) कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१०. श्री. संभाजी ब. व्हनाळकर, अपर कामगार आयुक्त (कामगार आयुक्त यांचेमार्फत)
११. निवडनस्ती (कामगार-८)